सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण -२०२४ /प्र. क्र.२०/२०२४/कोषा. प्रशा-५, दि. २०/०३/२०२६

**विषय:-** अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये यांचे मार्फत होणारी सर्व प्रदाने भारतीय रिझर्व्ह बॅकेच्या ई-कुबेर (e- kuber) मार्फत अदात्यांच्या बॅक खात्यात थेट जमा करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२४ /प्र.क्र.२०/२०२४/कोषा.प्रशा-५,दि.२०/०३/२०२६,ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२०१५३३५७७४०५असा आहे.

२. तरी, सदर शासन शुध्दीपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 24-03-2026 14:54:42

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिति तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**अधिदान व लेखा कर्यालय मुंबई, जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कर्यालये यांचे मार्फत होणारी सर्व प्रदाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ई-कुबेर (e-Kuber) मार्फत अदात्यांच्या बँक खात्यांत थेट जमा करणेबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२४/प्र.क्र.२० /२०२४/कोषा.प्रशा.-५**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक:- २० मार्च, २०२६**

**वाचा:-** वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.२०/२०२४/कोषा.प्रशा.-५, दि.१६.०८.२०२४

**प्रस्तावना:**

उपरोक्त वाचा मधील शासन निर्णयाद्वारे ई-कुबेर प्रदानाची कार्यपद्धती विषद करण्यात आलेली असून, उक्त शासन निर्णयाचे जोडपत्रमधील मुद्दा क्र. ९ ते ११ मध्ये अधिदान व लेखा कार्यालय/ कोषागाराने पारित केलेल्या देयकामधील अदात्यांचा प्रदान विषयक तपशील पुन: तपासणीसाठी बिम्स प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्याविषयी निर्देश आहेत. वास्तविकत: अधिदान व लेखा कार्यालय/कोषागारामध्ये पारित होणाऱ्या देयकांमधील अदात्यांचा प्रदानाविषयक तपशील हा आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनीच समुचित खात्री करुन बिल पोर्टल अथवा देयक तयार करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या तत्सम प्रणालीमध्ये भरलेला असतो. संबंधित प्रणालीद्वारे अदात्यांचा तपशील ट्रेझरीनेट प्रणालीत प्राप्त होतो. देयक पारित केल्यानंतर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनीच प्रणालीद्वारे सादर केलेला तपशील, पुनर्तपासणीसाठी त्यांनाच प्रणालीद्वारे उपलब्ध केला जातो. या प्रक्रियेसाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना १० दिवसांचा कालावधी दिला जातो. तथापि अनेक वेळेला हे काम समय मर्यादेत होत नसल्याने अधिदान व लेखा कार्यालय/कोषागारास आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करावा लागतो. आहरण व संवितरण अधिकारी त्यांच्या उपलब्धतेप्रमाणे माहितीस प्रणालीवर मान्यता देतात व तोपर्यंत धनादेश शाखेत संबंधित देयके सांभाळावी लागतात. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची प्रणालीवर मान्यता प्राप्त झालेली देयके, अधिदान व लेखा कार्यालय/कोषागारात पारित करुन ठेवलेल्या देयकामधून शोधावी लागतात व तद्नंतर प्रत्यक्ष प्रदानाची कार्यवाही अधिदान व लेखा कार्यालय / कोषागारास पूर्ण करावी लागते. वरीलप्रमाणे कार्यवाहीस अनावश्यक मनुष्यबळ खर्ची पडते. तसेच प्रदानास होणाऱ्या विलंबाची जबाबदारी निश्चित करता येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता संदर्भाधिन शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रामधील “अधिदान व लेखा कार्यालय/ कोषागाराने पारीत केलेल्या देयकासंबंधित प्रदानाची माहिती तपासण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना बिम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याची” कार्यपद्धती रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन शुद्धीपत्रकः-**

संदर्भाधिन नमूद शासन निर्णय सोबतच्या जोडपत्रामधील परिच्छेद क्र ८ ते ११ रद्द करण्यात येत असून त्याऐवजी परिच्छेद क्र. ८ ते ११ खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत.

८) पर्यवेक्षक धनादेश शाखा, प्राप्त देयकांना लेखापरीक्षा शाखेने मान्यता देण्याचे निदर्शक म्हणून देयकावर प्रदान आदेश नोंदवला आहे, प्रदान आदेशाखाली सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी आहे, देयकावरील प्रदान आदेशामधील रक्कम, देयक आणि प्रणालीमधील माहितीशी पूर्णपणे जुळते आहे, इ. आवश्यक बाबींची नियमोचित तपासणी करतील. तपासणीमध्ये योग्य असल्याचे निदर्शनास आलेल्या देयकांच्या प्रदानास मान्यता देतील. प्रदानास मान्यता दिलेल्या देयकांना, प्रणालीवर प्रथम देयकनिहाय प्रमाणक क्रमांक व नंतर देयकामधील प्रत्येक प्रदाननिहाय प्रदानसूची क्रमांक (Advice No.)देण्यासाठी प्रणालीवर स्विकृती देतील. पर्यवेक्षकांनी स्विकृती दिल्यानंतर प्रणालीमध्ये देयकास प्रमाणक क्रमांक व त्यामधील प्रत्येक प्रदानास प्रदानसूची क्रमांक (Advice No.) प्राप्त होतील. यानंतर प्रणालीवरील देयकांची माहिती व ई -बिल्स, सहायक अधिदान व लेखा अधिकारी/ अप्पर कोषागार अधिकारी, धनादेश यांच्या लॉगीनला उपलब्ध होतील. तसेच मुद्रित स्वरुपाची देयके भौतिक स्वरूपात सहायक अधिदान व लेखा अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी यांना सादर करण्यात येतील. उपकोषागाराच्या संदर्भात सदर कार्यवाही ही उपकोषागार अधिकारी करतील.

९) पर्यवेक्षकांकडून प्राप्त, मुद्रीत/ ई -बिल संदर्भात सहायक अधिदान व लेखा अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी नियमोचित तपासणी करुन प्रदानास मान्यता देतील. प्रदानास मान्यता दिलेल्या देयकांचे प्रदान आदेश (Payment Mandate)प्रणालीवर तयार करुन स्विकृती देतील. प्रणालीत मान्यता दिलेल्या प्रदान आदेश(Payment Mandate) ई-कुबेर प्रणालीस सादर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करतील. प्रदान आदेशाची (Payment Mandate) कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्रणालीवरील देयकांची माहिती /ई- बिल पुढील कार्यवाहीस्तव प्रदान लिपिकास उपलब्ध होईल. तसेच मुद्रित स्वरुपातील देयके प्रदान लिपिकाकडे हस्तांतरीत करण्यात येतील. उपकोषागाराच्या संदर्भात सदर कार्यवाही ही उपकोषागार अधिकारी करतील.

१०) प्रदान लिपिक, प्राप्त मुद्रीत आणि ई बिलसाठी Bill Transit Register (BTR Form-9) प्रणालीवर तयार करतील, प्रत्येक मुद्रीत देयकावर प्रमाणक क्रमांक नोंदवतील व देयके पुढील कार्यवाहीस्तव संकलन शाखेस सादर करतील. सहायक अधिदान व लेखा अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी यांनी ई- कुबेर प्रणालीस सादर केलेल्या प्रदान आदेश (Payment Mandate) संबंधात Payment Mandate प्राप्त झाल्याची माहिती दर्शवणारे Acknowledgement, ई- कुबेरने केलेल्या प्रदानाची माहिती दर्शवणारे Debit Notification आणि अयशस्वी प्रदानाची माहिती दर्शविणारे Return Notification तसेच तद्संबंधीचे Credit Notification या संबंधीची माहिती ई-कुबेर प्रणालीकडून स्विकारुन ट्रेझरीनेट प्रणालीत भरणे व प्रदानाचे लेखांकन प्रणालीवर अचूकरित्या होत असल्याचे सुनिश्चित करतील. उपकोषागाराच्या संदर्भात सदर कार्यवाही ही उपकोषागार कार्यालयातील लिपिक करतील.

११) कार्यपद्धतीमधील बदल विचारात घेता, प्रणालीमध्ये अदात्यांच्या बँकखात्याची आणि प्रदान रकमांची माहिती अचूकपणे नोंदवणे आवश्यक आहे. यासाठी आहरण व संवितण अधिकारी/ अधिनस्त कर्मचारी यांनी, देयकातील प्रदान करावयाच्या अदात्यांचे नाव, बँक खात्याचा तपशिल, बँकेच्या मूळ कागदपत्रावरून प्रणालीत अचूकपणे नोंदवावा. अदात्याची नोंदणी पूर्वीच प्रणालीत केलेली असल्यास, अदात्यांची प्रणालीमधून निवड करताना अदात्यांचे पूर्ण नाव आणि बँक खाते क्रमांक याची खात्री करुनच निवड करावी. (नोंदणी झालेल्या आदात्यांमध्ये नाम साधर्म्याने चूकीचे अदाते निवडले जाऊ शकतात.) अदात्यांना प्रदान करावयाच्या रकमा, ह्या प्रदान आदेशाप्रमाणे अचूकपणे प्रणालीत नोंदवाव्यात. प्रणालीवर देयकांस मान्यता देण्यापूर्वी अदाता नाव, बँक खाते तपशिल आणि प्रदानाच्या रकमा अचूक असल्याची खात्री प्रदान आदेश आणि बँकेच्या मूळ कागदपत्रावरुन करावी. सदर प्रदाने अचूक व कालमर्यादित असल्याने देयके सादर करतानाच सर्व तपशील योग्य असल्याची आणि प्रदाने नियमाधीन असण्याची जबाबदारी पूर्णत: आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची राहील.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०३२०१५३३५७७४०५ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.03.20 15:36:46 +05'30'

**( रविकुमार लिंगनवाड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री तथा मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण , अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव
५. सर्व मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधान सभा / विधान परिषद व संसद सदस्य
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख
१०. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई

१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२. महाराष्ट्र, नागपूर
१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२४. सर्व विभागीय आयुक्त
२५. सर्व जिल्हाधिकारी
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२७. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/ पुणे /नाशिक/छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर
३०. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
३१. प्रादेशिक सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/ पुणे/नाशिक /छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर
३२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे /पुणे /नाशिक/छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३४. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३५. निवड नस्ती- कोषा प्रशा-५